**प्राधिकरणाचे अधिकांरी/कर्मचारी यांना नियमित वैद्यकीय चाचण्यांची (Health Check-up Plan) सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०२३/ 417 /प्र.१२**
**दिनांक : 02 FEB 2023**

ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 319
Date: 3.2.2023

**संदर्भ** : १. प्राधिकरणाचे ठराव क्र.७०६३, दि.२३.११.२०२२.
२. शासन निर्णय क्र.वैतधो-२०२१/प्र.क्र.३७/आरोग्य-३, दि.२२.४.२०२२
३. प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०२१/२०४६/प्र.१२, दि.३.८.२०२१

आ दे श

१/- उपरोक्त संदर्भाधीन ठरावाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या सेवेतील वय वर्ष ४० ते ५० या वयोगटातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना दोन वर्षातून एकदा व वय वर्ष ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी खाजगी रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करुन घेण्यांस मान्यता देण्यात आली. आहे. वैद्यकीय तपासणी करुन विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

२/- मुंबईस्थित कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी अपोलो क्लिनिक, कुलाबा, अंधेरी व वाशी हे रुग्णालय वैद्यकीय तपासणीसाठी अधिकृत करण्यात येत आहे. सदर चाचणीसाठी रु.३८००/- (रुपये तीन हजार आठशे मात्र) इतकी रक्कम वैद्यकीय खर्च म्हणून मर्यादित करण्यात आली आहे. अधिकारी/कर्मचारी यांनी सदर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी व केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कार्यरत असलेल्या प्राधिकरण/मंडळ कार्यालयाकडून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांनी केलेल्या वैद्यकीय तपासणी शुल्काची प्रतिपूर्ती अपोलो क्लिनिककडून देयक प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाकडून करण्यात यावी.

३/- मुंबईस्थित कार्यालये वगळता इतर प्रादेशिक कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.भाप्रसे-२०१८/प्र.क्र.२५०/२०१८/९, दि.१५/१२/२०१८ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद रूग्णालये/ संस्थांमधून वैद्यकीय तपासणी करुन विहित नमून्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. याकरिता संबंधित मुख्य अधिकारी यांनी संबंधित रुग्णालयांकडून वैद्यकीय तपासणीची सुविधा प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची संमती घेऊन रुग्णालय निश्चित करुन, संबंधित रुग्णालयाकडून रु.३८००/- चे मर्यादेत दर निश्चित करुन घेणे आवश्यक राहील.

४/- वैद्यकीय तपासण्यांचा १ दिवस हा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यांत येईल. सदर तपासण्या शासकीय सुट्टीच्या दिवशी केल्यास त्यासाठी कोणतीही रजा/बदली रजा अनुज्ञेय असणार नाही.

५/- सन २०२१-२२ मध्ये वय वर्ष ४० वरील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी यापूर्वी केली असल्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात फेब्रुवारी-मार्च, २०२३ मध्ये प्राधिकरणातील वय वर्ष ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय तपासण्या करुन विहित नमून्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६/- सदर वैद्यकीय तपासणी चाचणी फक्त कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता अनुज्ञेय आहे. त्यांच्यावर अवलंबित कुटुंबियांकरीता सदर सुविधा अनुज्ञेय नाही.

७/- सदर तपासणीची नोंद सेवापुस्तकात करणे बंधनकारक आहे. प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळातील कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवापुस्तकात नोंद घेतल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

८/- मुंबईस्थित कार्यालयांनी परस्पर अपोलो क्लिनिक यांचेशी संपर्क साधून वय वर्ष ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या तपासणीची दिनांक/वेळ (appointment) ठरविण्यांत यावी.

सदरचे आदेश म्हाडा संकेतस्थळ https://mhada.gov.in वर उपलब्ध राहील.

***मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण***
***यांचे मान्यतेने,***

(राजकुमार सागर)
**सचिव**/प्राधिकरण

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मं.
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा
८) मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं.,कोंकण,पुणे,नाशिक,औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ
९) चौकशी अधिकारी/प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी -१,२ /प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२) सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मंडळ
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१४) संचालक, पी.डी.सी. पुणे
१५) व्यवस्थापकीय संचालक/शि.पु.प्रा.
१६) सचिव/झो.पु.प्रा.

प्रत, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा. यांना वेबसाईटवर अपलोड करणेसाठी.
प्रत: प्रशासकीय अधिकारी, प्राधिकरण/मुंबई मंडळ/ मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं./कोंकण/ पुणे /नाशिक / नागपूर /औरंगाबाद/ अमरावती मंडळ
प्रत : कार्यासन अधिकारी/वित्त/प्रा.

प्रत माहितीसाठी :-
मा.अध्यक्ष/प्रा. यांचे खाजगी सहायक.
मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहायक.
मा.सभापती/ मुं.इ.दु.व पु.मं.यांचे स्वीय सहायक.
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.
प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

प्रत: प्रशासन - ११/१४/१४ ड/प्रा.

प्रत: डॉ.संजय कपोते, संचालक, अपोलो क्लिनिक, कुलाबा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

# ANNEXURE – II

**Apollo Clinic Colaba:**

Eucharistic Congress Building, Opp. Cafe Leopold
Behind Bank of Baroda, Convent Street, Near Delhi Darbar Restaurant
Colaba, Mumbai 400 001.
022-22021122 (9 Lines )

**Apollo Clinic Andheri (East):**

Xtrium Building, Ground Floor
Next to Holy Family church
Chakala Junction
Andheri- Kurla road.
Andheri ( E )
Mumbai 400 093
022-46105555

**Apollo Clinic Vashi:**

Emerald , First Floor
Plot No 195, Sector 12
Besides Neel Siddhi Tower,
Vashi ,Navi Mumbai 400703
022-27881322/23

9)

ICT | Cell | A